NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

# प्रसिद्धिपत्रक

**नवी दिल्ली, दिनांक: 01 जुलै 2021**

## श्री सतीश अग्निहोत्री नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशनचे नवे व्यवस्थापकीय संचालक नियुक्त

श्री सतीश अग्निहोत्री (आयआरएसई 1982) (निवृत्त.), माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, रेल विकास निगम लिमिटेडचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी 01 जुलै 2021 रोजी नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यभार हाती घेतला. त्यांनी आयआयटी, रुरकीमधून बॅचलर ऑफ इंजिनियरिंग (सिव्हील), 1982 आणि तसेच, मास्टर ऑफ इंजिनियरिंग (स्ट्रक्चर्स), 1984 या पदव्या मिळवल्या असून त्यांना आयआयटी, रूरकीद्वारा वर्ष 2013 मध्ये प्रतिष्ठित अशा अॅल्युम्नस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

श्री अग्निहोत्री यांना अतिशय मोठ्या रेल्वे मुलभूत संरचन प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा 20 वर्षांपेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी सुमारे 9 वर्षे रेल्वे मंत्रालयाच्या अंतर्गत रेल विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल), शेड्युल 'अ' सीपीएसईचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम केले आहे. त्यांनी हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन (एचएसआरसी) या आरव्हीएनएलच्या पूर्ण मालकीच्या अनुषंगी कंपनीच्या जुलै 2012 मधील आरंभापासून ऑगस्ट 2018 पर्यंत अध्यक्षपद देखील भूषवले आहे. एसएसआरसी चीन, स्पेन, इ.सह सरकारांदरम्यानच्या पातळीवर हाती घेतलेल्या अनेक हाय-स्पीड अभ्यास करण्यासाठी भारतीय बाजूचा प्रतिभाग असलेली एजन्सी होती आणि तिने 5 हाय स्पीड रेल कॉरिडोर्सच्या व्यवहार्यतेचा अभ्यास पूर्ण केला.

आपल्या कारकिर्दीत आरव्हीएनएलचे सीएमडी असताना, आरव्हीएनएलने 7000 किमी लांबीचे प्रकल्प पूर्ण केले, ज्यात 3000 किमी दुहेरीकरण/3री लेन टाकणे, 880 किमी मीटर गेज ते ब्रॉड गेजमध्ये रूपांतरण, 3000 किमी रेल्वेचे विद्युतीकरण, 85 किमी नवी लाइन, 6 फॅक्टरीज आणि अनेक महत्त्वाच्या पुलांचे काम पूर्ण केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आंध्र प्रदेशात एका नव्या लाइनच्या प्रकल्पात 7 किमी लांबीच्या बोगद्याचे काम देखील विक्रमी 25 महिन्यांमध्ये पूर्ण झाले.

सुषमा गौर

प्रवक्ता /
अतिरिक्त महा व्यवस्थापक/ कॉर्प. कम्युनिकेशन
एनएचएसआरसीएल
फोन 9810296813